## बोदवड कॉलेजच्या सारिका तायडे व कोमल देठे यांची खो-खो व कबड्डी विभागीय खेळासाठी निवड.

नुकत्याच जळगाव विभाग अंतर्गत आंतर महाविद्यालयीन खो खो स्पर्धा जळगाव येथे एम.जे.कॉलेजच्या खो खो मैदानावर संपन्न झाल्या त्यात कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवडचा संघ सहभागी झाला होता. महाविद्यालयीन खो खो संघ विभागात चौथ्या क्रमांकावर होता, चांगल्या खेळाच्या जोरावर सारिका तायडे हिची ल.ना.चव्हाण महाविद्यालय चाळीसगाव येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी जळगाव विभाग संघात निवड झाली आहे.

दि. ०१/१०/२०१८ रोजी बाहेती महाविद्यालय जळगाव येथे आयोजित आंतर महाविद्यालयीन कबड्डी खेळात महाविद्यालय संघ सहभागी झाला होता त्यातही कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवडचा खेळ विभागात चौथ्या क्रमांकावर होता. सदर स्पर्धेत चांगली कामगिरी केल्याने सारिका तायडे व कोमल देठे ह्यांची विभागीय स्पर्धेसाठीच्या सराव शिबिरासाठी निवड झाली आहे. सदर शिबीर हे ॲड बाहेती महाविद्यालय जळगाव येथे असून दि. १५/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१८ या दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अंतर्गत विभागीय स्पर्धेसाठी महाविद्यालयात संपन्न होणार असून सदर स्पर्धेसाठी संघात त्यांची निवड झाली आहे त्यांना क्रीडा संचालक डॉ.किशोर पाठक यांचे मार्गदर्शन लाभले.खेळाडूंचे प्राचार्य अरविंद चौधरी, उपप्राचार्य देवसिंग पाटील संस्थेचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष मिठूलालजी अग्रवाल उपाध्यक्ष अजयजी जैन सचिव विकासजी कोटेचा यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस सुभेच्छा दिल्या.



